ग्रंथमालिका 'धार्मिक कृतींमागील शास्त्र' : देवपूजा - खंड २

४

# पूजासाहित्याचे महत्त्व

## विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ६

卐 काही सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचा परिचय ८

卐 'धार्मिक कृतींमागील शास्त्र' या ग्रंथमालिकेचे मनोगत ७

卐 आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ११

卐 प्रस्तावना १३


## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. पूजेच्या तबकातील घटकांची मांडणी कशा प्रकारे करावी ? १४

२. सप्तनद्यांचे जल १५

३. कापसाचे वस्त्र १८

४. जानवे १८

५. हळद, कुंकू, शेंदूर, गुलाल आणि गंध १९

६. अत्तर ३२

७. फुले ३४

८. पत्री ३९

९. अक्षता ४३

१०. गंधाक्षता, अष्टगंध, गंध (चंदन), रक्तचंदन, हळद, कुंकू, बुक्का आणि शेंदूर यांचे महत्त्व ४८

११. विड्याचे पान ४९

१२. सुपारी ५१

१३. नारळ ५४

१४. पंचखाद्य (सुका मेवा), पाच फळे आणि हळकुंड ५४

१५. निरांजनातील वात ५५

१६. उदबत्ती आणि धूप ५६

१७. कापूर ६५

१८. नैवेद्य ६६

१९. दक्षिणा ६७

२०. भस्म, गायीचे शेण आणि पाणी ६८

२१. रांगोळी ६९

२२. पंचगव्य ७०

२३. पूजासाहित्याच्या घटकांकडून शिकायला मिळणारे गुण ७२

२४. पूजेशी संबंधित विविध वस्तू, त्यांच्यामुळे होणाऱ्या लाभाचे प्रमाण, शुद्धी होण्याचे माध्यम आणि शुद्धी होणारा देह ७३

**सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !**

- ग्रंथांतील ७० टक्के लिखाण हे अन्य संदर्भग्रंथांतील लिखाण, साधकांना सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान इत्यादी स्वरूपाचे आहे, तर ३० टक्के लिखाण ग्रंथांचे संकलक परात्पर गुरु डॉ. आठवले यांना गुरूंच्या आशीर्वादामुळे आतून स्फुरलेले आहे.
- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी 'का अन् कसे ?' यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना सहज समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी सांगणे) ज्ञान !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !
- साधनेविषयीचे तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

## 卐 — ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ या ग्रंथमालिकेचे मनोगत — 卐

पूर्वीच्या काळी हिंदूंच्या शिक्षणपद्धतीत ‘धर्म’ या विषयाचा अंतर्भाव असायचा. धर्माचे महत्त्व कळल्याने बहुसंख्य हिंदूंच्या जीवनाचा केंद्रबिंदू धर्म हाच असायचा. कालांतराने हिंदूंना धर्मशिक्षण न मिळाल्याने साहजिकच हिंदूंची धर्माचरणाची प्रवृत्ती घटली. सांप्रत सण, उत्सव, व्रते, तसेच परंपरागत धार्मिक कृती यांच्यामुळे बहुतांश हिंदूंची धर्मनिष्ठा व ईश्वरोपासना टिकून आहे. विविध नित्य आणि नैमित्तिक धार्मिक कृतींना हिंदूंच्या सामाजिक, सांस्कृतिक अन् आध्यात्मिक जीवनात म्हणूनच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. धार्मिक कृतींमध्ये दैनंदिन पूजा-अर्चा, देवळात जाणे यांपासून मृत्यूनंतर करावयाच्या कृतीपर्यंतच्या अनेक गोष्टींचा समावेश होतो. या धार्मिक कृती आजही तेवढ्याच श्रद्धेने केल्या जाण्यामागील कारण म्हणजे या कृतींमागील सिद्ध अध्यात्मशास्त्राची सर्वांना आलेली प्रचीती होय.

धार्मिक कृती करणाऱ्याला त्या कृतीमागील नेमके शास्त्र समजल्यास त्याचा त्या कृतीसंबंधी विश्वास वाढतो आणि त्या कृतीचे महत्त्व लक्षात येऊन ती श्रद्धेने होते. श्रद्धापूर्वक तसेच अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य केलेल्या, कृतीचे फळ अधिक चांगले (उत्तम) मिळते. सध्या उपलब्ध असलेल्या धर्मशास्त्राविषयीच्या ग्रंथांत धार्मिक कृती करण्याविषयी विवेचन केले आहे; पण त्यामागील सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक कारणमीमांसा दिलेली नाही. ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र ?’ या ईश्वरी कृपेमुळे प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या ग्रंथमालिकेचे वैशिष्ट्य असे की, यात धार्मिक कृतींमागील सूक्ष्म अध्यात्मशास्त्र स्पष्ट करण्यासह त्या कृती करण्याच्या योग्य पद्धतीही सांगितल्या आहेत.

आधीची पिढी जुनेजाणते सांगत असलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवून तशी कृती करत असे. सध्याच्या तरुणपिढीचा कल प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा जाणून घेऊन मगच ती स्वीकारण्याकडे असतो. धार्मिक कृतींमागील शास्त्रीय कारणमीमांसा कळल्यास तरुण पिढीही अध्यात्माकडे आकृष्ट होईल.

卐 卐

या ग्रंथात दिलेल्या धार्मिक कृतींचे आचरण करण्याची सद्‌बुद्धी प्रत्येकाला होवो अन् त्याची आध्यात्मिक उन्नती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

卐 卐

## वाचकांना विनंती !

१. साधकांना ईश्वरी कृपेमुळे ज्ञान मिळण्याच्या प्रक्रियेचा वेग प्रचंड असल्याने, तसेच आसुरी शक्ती ज्ञानप्राप्तीत अडथळे आणून चुकीचे ज्ञान (माहिती) देण्याची शक्यता असल्याने साधकांकडून ज्ञान ग्रहण करण्यात क्वचित एखादी चूक रहाण्याची शक्यता असते; म्हणून त्यांना ज्ञानात मिळालेले आणि धर्मशास्त्रात दिलेले धार्मिक कृतींविषयीची माहिती किंवा तात्त्विक विवेचन यांत भिन्नता असण्याची शक्यता आहे. आम्ही धर्मशास्त्र हेच प्रमाण मानत असल्याने वाचकांनी अशा भिन्नतादर्शक कृती किंवा तात्त्विक विवेचन आढळल्यास आमच्या लक्षात आणून द्यावे, ही विनंती. ग्रंथाच्या पुढील आवृत्तीत या संदर्भात योग्य ती सुधारणा करण्यात येईल.

२. 'केवळ ईश्वरच लिहू शकेल', अशी आगळी भाषाशैली आणि अध्यात्मातील प्रत्येक विषयाची अधिकाधिक सूक्ष्म-स्तरावर उकल करणारे अध्यात्मशास्त्रीय ज्ञान, यांचा अजोड संगम असलेले हे ज्ञान आतापर्यंत आम्हाला अन्यत्र कोठेही आढळले नसल्याने ते अद्वितीय आहे, असे आम्ही समजतो. मात्र ईश्वराच्या कृपेने अशा प्रकारचे ज्ञान इतरांनाही मिळू शकते. अशांनी याविषयी आम्हाला कळवल्यास पुढील आवृत्तीत आम्ही त्याचा उल्लेख करू. – **प्रकाशक**

**टीपा** – १. ग्रंथात बर्‍याच ठिकाणी 'प.पू. डॉक्टर' किंवा 'प.पू. डॉ. आठवले' असा उल्लेख आला आहे, तो ग्रंथाच्या संकलकांपैकी 'परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले' यांच्याविषयी आहे.

२. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.